दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -९३ | सोमवार दि.०८ डिसेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-93 | Monday, Dt.08 December 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण करणार

## अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांची ग्वाही, सरकार शेतक-यांच्या पाठीशी

प्रतिनिधी @ नागपुर

राज्याची आर्थिक स्थिती जरी ओढाताणीची असली तरी दिवाळखोरीसारखी स्थिती अजिबात नाही. ज्या योजना हाती घेतल्या आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी पुरेशे पैसे आपल्या हातात आहेत. ९२ टक्के शेतक-यांना अतिवृष्टीसाठी जाहीर केलेली मदत देण्यात आली असून, उर्वरित शेतक-यांनाही लवकरच ही मदत दिली जाईल. कर्जमाफीचा शब्द दिलाय, तो काहीही झाले तरी पूर्ण करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना दिली.नागपूर येथे सोमवारपासून विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे. त्यापूर्वसंध्येला आयोजित मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारपरिषद घेतली. त्यात ते बोलत होते. या अधिवेशनात एकूण १८ विधेयके मांडण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सरकार पूरग्रस्त शेतक-यांच्या पाठिशी आहे. ९२ टक्के म्हणजे ९० लाखांच्या आसपास शेतक-यांना मदत प्राप्तही झाली आहे. ८ टक्के जे उरले, त्यांची केवायसीची अडचण आहे. अशा १२ लाख शेतक-यांपैकी अर्ध्यांचा प्रश्न सोडविला आहे. उर्वरित शेतक-यांचाही प्रश्न लवकरच सुटेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

विदर्भाबद्दल बोलणा-या विरोधकांनी २०१४ पूर्वीचा आणि आताचा विदर्भ पहावा. त्यांच्या लक्षात येईल की काय बदल घडला आहे. आचासंहितेमुळे अधिवेशनाचा कालावधी कमी ठेवावा लागला असला तरी विदर्भ-मराठवाड्यासह संपूर्ण मागास भागाच्या प्रश्नांना न्याय देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे,



### विरोधी पक्षनेत्याचा निर्णय अध्यक्ष घेतील

विरोधकांनी विधिमंडळाच्या दोन्ही सदनांत विरोधी पक्षनेता नेमण्यावरून आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधी पक्ष नेता नेमण्याचा अधिकार पूर्णपणे सभापती आणि अध्यक्षांचा असतो. ते जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल. विरोधी पक्षाने परंपरा पाळत चहापानावर बहिष्कार टाकला. त्यांची पत्रकार परिषद निराशेने भरलेली आणि केवळ त्रागा करणारी होती. पत्रावर सह्या करायला पण त्यांना कोणी मिळाले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची कोणाचीही सही त्यावर नाही. त्याचा वेगळा अर्थ मी काढणार नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

# शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न व मागण्या निकाली काढणार

बीड ।प्रतिनिधी

शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांचा सत्कार प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीडच्या वतीने जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांच्या हस्ते नुकताच संपन्न झाला.या सत्काराला उत्तर देताना शिक्षणाधिकारी यांनी शिक्षकांची सर्व प्रलंबित प्रश्न व मागण्या शीघ्र गतीने पारदर्शक पद्धतीने निकाली काढण्याचे आश्वासन प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीडला त्यांनी दिले अशी माहिती जिल्हा संपर्कप्रमुख शहादेव मराठे यांनी दिली आहे.

प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या सत्काराप्रसंगी प्रहारच्या कार्याची माहिती तालुकाध्यक्ष

(उर्वरीत पान २ वर)



प्रहार कडून शिक्षणाधिकारी (प्रा.) श्रीमती प्रियाराणी पाटील यांचा सत्कार संपन्न

# पालकमंत्री साहेब, बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील विकास कामे ठप्प !

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे सर्व कामे ठप्प आहेत. निधीची उपलब्धता नाही, त्यामुळे सर्व कामे थांबली आहेत. महापुरुषाचे पुतळे, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, फर्निचर, विद्युतीकरण आदी कामे थांबली आहेत. पाठपुरावा नसल्याने मागणी करूनही निधी मिळालेला नाही. तर दुसरीकडे बीड जिल्हा परिषदेतील रिक्त पदांमुळे कामे होत नाहीत. अशी ओरड करण्यात येत असली तरी अधिकाऱ्याचा अकार्यक्षमपणा आणि अर्थपूर्ण व्यवहारामुळे किरकोळ कामेही होत नाहीत.

बांधकाम विभागातील सर्वच कामाचा आढावा घ्यावा. पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांनी निधी उपलब्ध करुन घ्यावा आणि विकास कामांना गती द्यायला हवी, अशी मागणी करण्यात आली आहे. बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या क्रमांक १ कार्यालयाचे मोमीन नावाचे कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत. खालचे अधिकारी, कर्मचारी ऐकत नाहीत. कामांना गती येत नाही, अशी त्यांचे म्हणणे आहे. सेवानिवृत्तीला थोडे दिवस राहिले, म्हणून ते सतत गायब असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

किरकोळ कामे आणि दुरुस्तीही नाही अतिवृष्टीमुळे बीड जिल्हा परिषदेच्या तळमजल्यात पाणी घुसले होते. सदर पाणी काढण्यासाठी पाच-सहा दिवस लागले. करोडो रुपयांच्या इमारीसाठी तळ मजल्यावरील पाणी खेचण्यासाठी पंप बसविण्यात आलेला नाही. यातून अधिकाऱ्याची निष्क्रियता आणि कर्तव्यशून्यता दिसून येते. खाऊगिरी वाढल्यामुळे किरकोळ कामातही काही मिळते का? हे पहिले जाते.

### बांधकाम विभागातील कारभार ढेपाळला

कार्यकारी अभियंता बांधकाम नं. १ प्रमाणेच कार्यकारीअभियंता बांधकाम विभाग नं. २ विभागातील कारभार ढेपाळला आहे. आर्थिक गैरव्यवहार आणि अकार्यक्षमता यामुळे रजेवर गेले कार्यकारी अभियंता हे रुजू झालेआहेत. मात्र वेगळ्याच तंद्रीतअसलेल्या कार्यकारी अभियंत्याला जिल्ह्यात कोणती कामे चालली? आणि कुठे कोण काय, काम करतो? याचा काही थांगपत्ता नसतो. या विभागातही अनियमितता वाढली आहे.दस्तुरखुद्द बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या दोन्ही विभागात लक्ष घालून किमान किरकोळ कामांना गती द्यावी. कामचुकार आणि अकार्यक्षम कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना वठणीवर आणावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# परळी-धर्मापुरी मार्गावर लाखोंची लुटमारी

परळी / प्रतिनिधी

धारावती तांडा रोडवर जिम करून येणाऱ्या तरुणाच्या गाडीला धडक देऊन चाकूचा धाक दाखवून डोळ्यात चटणी टाकून २ लाख २० हजार रुपयाचे साहित्य लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी ४ जणां विरुद्ध परळी ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल कारण्यात आला. चोरट्यांकडून झालेल्या या चोरीच्या घटनेमुळे परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

धारावती तांडा येथील यशवंत प्रेमदास पवार हे ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता हे व्यायाम करून परळीवरून धारावती तांड्याकडे मोटारसायकलवरून जात असताना, काळरात्री देवी मंदिर रोडवर चव्हाण यांच्या बंद धाब्यासमोर दोन मोटारसायकलवरून आलेल्या चार आरोपींनी त्यांचा पाठलाग करत अचानक धडक दिली. तोंडाला मास्क लावून त्यापैकी एकाने तात्काळ चाकू दाखवून धमकावले, तर दुसऱ्याने त्यांच्या डोळ्यात चटणी टाकून त्यांना धरून ठेवले. त्यानंतर त्यांना धरून ठेवले आणि क्षणात त्यांच्या गळ्यातील साडेतीन तोळ्यांची सोन्याची चैन आणि एक तोळ्याच्या दोन अंगठ्या हिसकावून चोरटे फरार झाले. साडेतीन तोळ्यांची सोन्याची चैन - १,४०,००० दोन सोन्याच्या अंगठ्या - ८०,००० असे एकूण २,२०,००० रुपयेचे किमतीचे साहित्य लुटून घेऊन पसार झाले.

यशवंत प्रेमदास पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चार अनोळखी आरोपींवर इछड २०२३ कलम ३०९(ब), २८१, १२६(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परळी ग्रामीण पोलीस निरीक्षक मजहर सय्यद हे तपास करीत आहेत. परळी ग्रामीण पोलीस निरीक्षक मजहर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून आरोपींचा तपासासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

# बीड स्त्रीरोग तज्ञ संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा थाटात संपन्न

बीड ।प्रतिनिधी

संघटना चालविण्यासाठी एकीचे बळ महत्त्वाचे आहे. वैद्यकीय क्षेत्रातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी संघटना महत्त्वाची आहे. बीड स्त्रीरोग तज्ञ संघटनेच्या माध्यमातून विविध विधायक कामे होतील. विधायक आणि विकासात्मक कार्याला सर्वांनी सहकार्य केले पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीचे संचालक डॉ.अशोक थोरात यांनी केले.

बीड स्त्रीरोग तज्ञ संघटनेच्या पदाधिकारी पदग्रहण सोहळा बीड येथे दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. यावेळी डॉ. अशोक थोरात बोलत होते. कार्यक्रमास ज्येष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ. शरद राऊतमारे, डॉ. रोहिणी वैद्य यांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उप विभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार,डॉ. सुनील राऊतमारे, डॉ.अनिल बारकुल, स्त्री रोग तज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. शालिनी कराड यांची समायोजित भाषणे झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे सचिव डॉ.शरद शिंदे यांनी केले.यावेळी पदग्रहण सोहळ्यानंतर संघटनेचे नूतन पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अध्यक्ष- डॉ. शालिनी कराड, उपाध्यक्ष- डॉ. शिवाजी सानप, सचिव - डॉ.शरद शिंदे, सहसचिव डॉ. राहुल वाघमारे, क्लिनिकल सचिव तांबडे, डॉ.तनुजा मकसूद, डॉ. डाके आदींना गौरविण्यात आले. या कार्यक्रमात दिवंगत डॉ. श्रीहरी लहाने यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी लहाने कुटुंबियांनी पुरस्कार स्वीकारला. तर स्व. डॉ. कुमुद धायतडक यांनाही उत्तर जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला.

यावेळी डॉ.सुनील राऊतमारे, डॉ. रोहिणी वैद्य,डॉ. देवयानी खरवडकर, डॉ. राजेंद्र ढाकणे, यु. डी. कुलकर्णी, डॉ. शाम काळे, डॉ. त्र्यंबक चाटे, कुमुदिनी काळे, डॉ. शिरपूरकर, डॉ.शरद शिंदे, गणेश कुटे यांचाही सत्कार करण्यात आला. गायन स्पर्धेत

(उर्वरीत पान २ वर)



# माझ्या जीवाला धोका,मी रडारवर असल्याची माहिती उघड - देशमुख

## धर्माधिकारी यांच्या सीडीआर चौकशीतून आतापर्यंत घडलेल्या सर्व घटना उजेडात येतील

परळी ।प्रतिनिधी

परळी नगर परिषद निवडणुक निकालापूर्वीच शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे नेते दिपक रंगनाथ देशमुख यांनी पत्रकार परिषदेत अत्यंत गंभीर आरोप करत मला संपवण्याचा कट रचला जात आहे, मी रडारवर असल्याची माहिती एका क्लिप मधून समोर आली आहे असा खळबळजनक दावा केला.

देशमुख यांनी स्ट्राँग रूममध्ये ठेवलेल्या (ईव्हिएम) मशीन मतपेट्यांची सुरक्षा धोक्यात असल्याचा आरोप करत, प्रभाग क्रमांक १, ११ व १२ मध्ये बोगस मतदान झाल्याचा दावा केला. या प्रभागांमध्ये फेरमतदान घेण्याची मागणी करण्यात आली असून, मात्र निवडणूक निर्णय अधिकारी न्यायालयात जाण्याची भाषा करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. निवडणूक निर्णय अधिकारी नेमकं काय करत आहेत ? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

पत्रकार परिषदेत देशमुख यांनी जीवाला धोका असल्याबाबतची ऑडिओ रेकॉर्डिंगही सादर केली. या रेकॉर्डिंगमध्ये माजी नगराध्यक्ष, आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय बाजीराव भैय्या धर्माधिकारी व त्यांच्या कार्यकर्त्यांमधील संभाषण असल्याचा दावा करण्यात आला. या संभाषणात दिपक देशमुख रडारवर आहेत असा

(उर्वरीत पान २ वर)



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

# माता व बाल संगोपन रुग्णालयाला पावणेदोन कोटींचा निधी मंजूर

**पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार, सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश - डॉ. गणेश ढवळे**

### पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार - डॉ. ढवळे

बीड जिल्हा रुग्णालयाची सध्याची क्षमता ३२० खाटांची आहे, तर प्रत्यक्षात रुग्णसंख्या ४५० च्या घरात असते. प्रसूती व प्रसूती-पश्चात विभागात क्षमतेपेक्षा जास्त रुग्ण असल्याने गर्भवती महिलांना अनेकदा खाट उपलब्ध होत नाही. या परिस्थितीत १०० खाटांच्या स्वतंत्र माता-बाल रुग्णालयामुळे महिलांना आणि बालकांना स्वतंत्र, सुरक्षित व सुसज्ज उपचारसुविधा मिळणार आहेत.फर्निचर व सिलिंग कामांसाठी पावणे दोन कोटींचा निधी मंजूर केल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे मनःपूर्वक आभार असल्याचे डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी म्हटले आहे.



बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालय परिसरात २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मंजूर झालेले १०० खाटांचे माता व बाल संगोपन रुग्णालय तब्बल २१ कोटी खर्चून २०२३ मध्ये पूर्ण झाले. मात्र गेली दोन वर्षे निधीअभावी लिफ्ट ,फर्निचर, सिलिंग आणि ऑक्सिजन पाईपलाईनची कामे रखडली असल्याने ही इमारत धुळखात पडून होती.

सदर प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख व बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे महाराष्ट्र राज्य प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २ वर्षांपासून सतत निवेदने, आंदोलनाद्वारे हा विषय सातत्याने पुढे आणला होता. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांना निवेदन देत, निधी तातडीने उपलब्ध न झाल्यास 'पालकमंत्री अजितदादा के नाम पे देदे बाबा' लक्ष्यवेधी भिक मागो आंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला होता.

या पाठपुराव्यानंतर अखेर जिल्हा नियोजन समितीने निधी मंजूर केला आहे. यामध्ये प्रामुख्याने फर्निचर : ९८ लाख ५ हजार, सिलिंग काम : ४९ लाख ५ हजार, ऑक्सिजन प्लांट ते इमारत पाईपलाईन : २५ लाख, एकूण - १ कोटी ७३ लाख (पावणे २ कोटी रुपये)

## संपादकीय

### 'स्थानिक स्वराज्य'ची ससेहोलपट सुरूच..

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सतत सुरु असलेल्या गोंधळ, विलंब आणि अनिश्चिततेमुळे या व्यवस्थेचे लोकशाहीतील महत्त्व आज गंभीर प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडले आहे त्याबद्दल-अखेर २६४ नगर परिषदा आणि नगर पंचायत निवडणुकीचे मतदान पार पडले. येत्या २० तारखेला उर्वरित २४ ठिकाणचे मतदान पार पडेल आणि २१ तारखेला निकाल येईल. त्या आधी जिल्हा परिषदांचा कार्यक्रम जाहीर होतो की महानगरपालिकांचा याची उत्सुकता आहे मात्र महानगरपालिकांचा कार्यक्रम आधी जाहीर होईल अशी दाट शक्यता आहे.काहीही असो, गेल्या काही वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रचंड ससेहोलपट झाली. ग्रामीण बोलीत सांगायचे झाले तर त्यांना सवतीचे पोर अशीच वागणूक मिळत आहे. लोकशाही व्यवस्था लोकांच्या कलाने चालवणे अभिप्रेत असते. पण राजकीय पक्ष आणि त्यांचे कर्तेधर्ते यांना प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे. ते ठरवतील तेच धोरण अंमलात येऊ लागले. संवाद हा लोकशाहीचा आत्मा आहे आणि त्याचे संसद वा विधिमंडळ हे सर्वोच्च केंद्र आहे. तिथे चर्चा करूनच देश व राज्याबाबतची धोरणे राबवली जावीत असे अपेक्षित आहे.

संसदीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार करताना व्यापक लोकहित हाच विचार होता. आमच्या पक्षाला असे वाटते, म्हणून आम्ही असेच करणार असे अपेक्षित नव्हते. पण आता ते अंगवळणी पडले आहे. त्यातून बाहेर पडणे कठीण जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था हे संसदीय लोकशाहीचे लघुरूप. शहरे आणि गावे यांचे व्यवस्थापन स्वतंत्र पद्धतीने व्हावे, त्यांना कोणावरही विसंबून राहण्याची वेळ येऊ नये, सरकारला वाटेल तेव्हा त्यांच्या निवडणुका होऊ नयेत आणि त्या निःपक्षपातीपणे व्हाव्यात म्हणून राज्य पातळीवर निवडणूक आयोग स्थापन झाले. निवडणूक आयुक्तांना उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीसमकक्ष दर्जा देण्यात आला. म्हणजेच त्यांना निर्भयपणे कारभार करता यावा याची तजवीज केली गेली.

पण झाले काय तर आयुक्तांची निवड सत्ताधारी पक्षांच्या कलाने होऊ लागली. पाच वर्षे कालावधीचे हे पद सेवानिवृत्तीकडे झुकलेल्या वरिष्ठ नोकरशहांना खुणावू लागले. आपली बाजू भक्कम असावी म्हणून असे नोकरशहा सेवेत असतानाच तिथे जाण्यासाठी वातावरणनिर्मिती करू लागले. डी. एन. चौधरी यांच्यासारखे विधि व न्याय विभागाचा, विधी आयोगाचा अनुभव असलेले अभावानेच अशा पदांवर आले. खरेतर आयुक्त हा विधि क्षेत्रातला नामवंत असणेच उत्तम. याचे कारण आज विविध न्यायालयात डझनावारी प्रकरणांची सुनावणी सुरू आहे. आयोगाने अशा सुनावणीसाठी निष्णात वकिलांच्या नियुक्त्या व कायदेशीर सल्ले घेत बसायचे की नेमून दिलेले दैनंदिन काम करायचे?

नगरपालिका व नगर पंचायतीचे सोडून द्या पण इतर २-३ विषयांवर २२-२३ याचिका न्यायप्रविष्ट आहेत. त्याचे विषय ओबीसी आरक्षण, प्रभाग रचना कमी-जास्त करणे आणि प्रभाग निश्चितीचे अधिकार राज्य सरकारचे की आयोगाचे आहेत हे ठरवणे. असे असेल तर आयोगाची स्वायत्तता कुठे गेली? हा प्रश्न राज्यातल्या शहाण्या-सुरत्या लोकांना का पडत नसावा? यावर कोणी बोलत का नाही? शहरे व गावांचे व्यवस्थापन इतके उत्कृष्ट सुरू आहे की, निवडणुकांचा विषय होत राहील त्याने काय फरक पडणार आहे अशी भावना आहे? गेली ५-७ वर्षे निवडणुका होत नाहीत. त्याने प्रशासकराज किती कामाचे व बिनकामाचे हे ही लोकांना कळले आहे. पण राजकीय कार्यकर्त्यांची कितीतरी मोठी आबाळ झाली. तेही गप्प आहेत.

या देशात एक काळ असा होता की, प्रत्येक राजकीय पक्षाचे वार्षिक-द्वैवार्षिक अधिवेशन पार पडायचे आणि त्यात पक्षाच्या प्रत्येक भूमिकेवर जाहीर चर्चा व्हायची. सामान्य कार्यकर्त्याचे विचारसुद्धा नीट ऐकले जायचे आणि त्याला पक्षाचे प्रमुख कारभारी उत्तर द्यायचे. शंका समाधान व्हायचे. आता कार्यकर्त्यांची व्याख्या बदलली आहे. कंत्राटदार, पुरवठादार हे जोडउद्योग महत्त्वाचे झाल्याने अनेकांना इच्छा असूनही वेगळे काही मत मांडता येत नाही किंवा मांडायचेच नाही. 'काम' निघतेय ना आणि ते आपल्याला मिळतेय ना, मग कशाला वेगळा सूर लावा असा पवित्रा असेल तर उर्वरित चर्चा फोल आहे.

## चोंडी येथे आ. डॉ तुषार राठोड यांची सात्वनपर भेट



मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील चोंडी येथील प्रा. प्रकाश पा. चोंडीकर यांच्या आई तर भाजपा महिला मोर्चा नांदेड जिल्हा अध्यक्षा अनिता प्रकाशराव पा. चोंडीकर यांच्या सासू स्व. रुक्मिणबाई निळकंठराव पा. चोंडीकर यांचे निधन झाले होते.आ. डॉ. तुषार राठोड साहेबांनी प्रा प्रकाशराव पा. चोंडीकर व प्रा सौ अनिता पा चोंडीकर यांच्या निवास्थानी सांत्वन भेट दिली. यावेळी, माजी सभापती खुशाल पा उमरदरीकर, संतोष अण्णा बोनलेवाड एम डी राठोड राजू पा उंद्री कर, किरण पा जाहूर कर गोटू पाटील बिलाळकर, डॉ अमोल कलेटवाड,गंगाधर चोंडीकर,व्यंकटराव जाधव सर, अदनान पाशा, गावातील बालाजी पा बसापूरे, प्रा शंकरराव बसापुरे, शेख मुजाहिद चोंडीकर, पांडुरंग कंधारे, बालाजी दोरनाळे प्रकाश बसापुरे, योगेश पा देवकते आकाश पाटिल व ग्रामस्थ उपस्थित होते.

## फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने महामानवाला महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

धाराशिव ।प्रतिनिधी

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. परमपुज्य बोधिसत्त्व महामानव विश्वरत्न संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या नियोजित जागेतील तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीस पुष्प अर्पण करुन बुद्ध वंदना घेण्यात आली.प्रसेन्ना ग्रुपच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले.महिला मंडळ,भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, मतदार जनजागरण समिती, पर्यटन जनजागृती संस्था धाराशिव,राजगीर बहुउद्देशीय सामाजिक संस्था अन्य सामाजिक संस्थेचे पदाधिकारी यांनी महामानवास अभिवादन केले. भारतीय संविधान उद्देशिका व विश्लेषण प्रत वाटप करण्यात आल्या. तसेच नायाब तहसीलदार महादेव शिंदे,नायाब तहसीलदार स्वामी, मुख्याधिकारी निता अंधारे यांनी महामानवास अभिवादन केले.नायब तहसीलदार महादेव शिंदे यांनी फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या जागेतील



तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी समितीचे अध्यक्ष गणेश वाघमारे,प्रवीण जगताप,संजय गजधने, सिध्दार्थ बनसोडे,अंकुश उबाळे,बलभीम कांबळे, बाळासाहेब गुळीग,अमर आगळे,रमेश कांबळे,नवनाथ वाघमारे,बौध्दाचार्य बाबासाहेब बनसोडे,बौध्दाचार्य धनंजय वाघमारे, नागनाथ गोरसे, ड.अनुरथ नागटिळक,बापु कुचेकर,श्रीकांत गायकवाड, पत्रकार समाधान मते,अतुल लष्करे,विशाल घरबुडवे,रुग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतीफ,एम डी देशमुख,किसन घरबुडवे,रवि सुरवसे,ड अजय वागाळे,पांडुरंग राऊत,विजय गायकवाड,अशोक बनसोडे,बापु बनसोडे,सुधाकर माळाळे,चालक मालक मोटार संघटनेचे उत्तम घरबुडवे

## जिव्हाळा बेघर केंद्र हे बनले निराधाराचे कुटुंब

**राजू वंजारे यांचे काम म्हणजे निस्वार्थ समाजकार्य - प्रेरित काझी**



बीड ।प्रतिनिधी

दि.७/११/२०२५ रोजी माजी मंत्री लोकनेते मा. जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त बीड येथील जिव्हाळा बेघर केंद्रामध्ये गरजू निराधार लोकांना अन्नदान व फळे वाटप करण्यात आले. या निमित्ताने कॅनडा देशातील रहिवासी मा.प्रेरित काझी (आर्किटेक्ट )हे उपस्थित होते.

प्रमुख अतिथी म्हणून त्यांच्या समवेत मुंबई येथील भीम आर्मीचे महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष मा. सुनील गायकवाड साहेब तसेच सामाजिक कार्यकर्ते ड.राहुल मस्के, शशांक सोनवणे (पुणे)विजय गायकवाड, आदींच्या उपस्थितीमध्ये या गरजू, बेघर, निराधार लोकांना अन्नदान व फळे वाटप करण्यात आले यावेळी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी भीम आर्मीचे महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष सुनील गायकवाड म्हणाले की, आपण या लोकांना आधार दिला आणि केव्हाही आपल्या या निराधार केंद्रास मदत करू. निराधार लोकांना आधार देण्याचे काम राजू वंजारे यांच्या माध्यमातून होत आहे हे आम्हाला अभिमानास्पद गोष्ट आहे सामाजिक काम करत असताना निस्वार्थीपणे आपण हे काम करत आहात याची समाजाणे जाणीव ठेवली पाहिजे आणि आपणास वेळोवेळी मदत केली पाहिजे अशी भावना व्यक्त केली याप्रसंगी ड.राहुल मस्के यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या सामाजिक कार्यकर्ते अशोकराव शेजवळ यांच्या माध्यमातून हा मा.जयदत्त अण्णा यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम

### पान १ वरून...

**बीड स्त्रीरोग तज्ञ ....**

प्रथम पारितोषिक मिळाल्यामुळे डॉ. वैद्य मॅडम यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात डॉ . दिनकर लहाने, यु. डी. कुलकर्णी, डॉ. राजेंद्र ढाकणे यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास डॉ. यंदे, डॉ. संतोष शहाणे, डॉ. शशिकांत दहिफळकर, डॉ. ओस्तवाल, डॉ. शाम काळे, डॉ. अमोल लहाने, डॉ. सुनील मस्तूद, डॉ. हुबेकर, डॉ. आप्पासाहेब बागलाणे, डॉ. शशिकांत दहिफळकर, डॉ. सतीश तांबडे, डॉ. अजय पंडित, डॉ. गणेश कुटे, डॉ. प्रदीप शेळके, डॉ. श्रीमती बरकुल, डॉ. फरीदा, डॉ. सौ. ज्योती घुमरे, डॉ. सौ. शहा, डॉ. उर्मिला शिंदे, डॉ. तनुजा मसूद, आदींची उपस्थिती होती.

**शिक्षकांचे प्रलंबित...**

सय्यद जिलानी, बाळासाहेब गावडे, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब वाघुले , उर्दू विभाग प्रमुख मिर्झा हसनात यांनी सविस्तर सादर केली. शिक्षणाधिकारी मॅडम यांनी प्रहारचे कार्य व संघटन कौतुकास्पद असून प्रशासन सदैव सोबत असल्याचे स्पष्ट केले.

याप्रसंगी प्रहार पदाधिकारी जिल्हा सचिव अविनाश काळे, कोषाध्यक्ष उत्तरेश्वर बजगुडे, उर्दू विभाग प्रमुख मिर्झा हसनात, जिल्हा कार्याध्यक्ष ओमप्रकाश आणेराव, प्रहार पेन्शनर सेल प्रमुख सुरेश प्रधान व राजेसाहेब चव्हाण, आरोग्य विभाग प्रमुख गोविंद गोचडे, प्रहार एज्युकेशन सेल प्रमुख अरविंद चौधरी व अण्णासाहेब खंडागळे, प्रहार जुनी पेन्शन सेल प्रमुख सुदर्शन काळे , प्रविणा कांबळे , प्रहार तक्रार निवारण सेलचे प्रमुख पी. आर. खेडकर व पुरषोत्तम खेत्रे , कार्याध्यक्ष नवनाथ धोंगडे ,सय्यद मुमताज , वैशालीताई आकुसकर, सहसचिव अंबादास बागलाने, जिल्हा प्रवक्ता पद्माकर आंधळे , मन्मथ अरबने, किरण सारुक ,निर्मलाताई वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष कादरी कदीर (शिक्षकेतर विभाग), पी. आर. खेडकर, महादेव गीते, शामराव मिरगे ,दिपक देशमुख, प्रल्हाद फड, शेख ऐनोद्दीन , वर्षाराणी महाजन, समन्वयक संजय पाटील, शामराव आघाव, अण्णासाहेब खंडागळे, शिवाजी झेंडेकर, संघटक श्रीमती प्रविणाताई कांबळे, बापूसाहेब शिंदे ,अशोक सप्रे, सुरेश वाघमारे, संजय लोखंडे, संपर्कप्रमुख संध्याताई टेकाळे, वसंत तरकसबंद, राजाराम लकडे, राजेंद्र बेले, पांडुरंग जोगदंड , शहादेव मराठे , विठ्ठल सानप, सहसचिव अंबादास बागलाने , महेश भट, संजय कुलकर्णी, बीड तालुकाध्यक्ष सय्यद जिलानी, वडवणी

### पान १ वरून...

तालुकाध्यक्ष संगीता तिडके, शिरूर कासार तालुकाध्यक्ष दत्तात्रय गाडेकर , गेवराई तालुकाध्यक्ष बाळासाहेब गावडे, माजलगाव तालुकाध्यक्ष लक्ष्मण सरवदे, पाटोदा तालुकाध्यक्ष मुकींद गाडे, आष्टी तालुकाध्यक्ष भाऊसाहेब काळे, धारूर तालुकाध्यक्ष हनुमंत मंत्रे, परळी तालुकाध्यक्ष कमलाकर कामाळे, अंबेजोगाई तालुकाध्यक्ष बाळासाहेब पिसुरे, केज तालुकाध्यक्ष प्रभूकांत सोन्ने, उर्दू विभाचे सय्यद अस्लम हबीब सर, बीड तालुका कार्याध्यक्ष (उर्दू विभाग) ,सय्यद अर्शद अली मेहबूब, प्रा. पदवीधर वडवणी तालुका कार्याध्यक्ष (उर्दू विभाग) ,शेख इलियास सर शिरुर तालुका उपाध्यक्ष , फारुकी रईसोद्दीन अनिसोद्दिन, शिरूर तालुका कार्याध्यक्ष शेख फैजल रेहमान, अब्दुल सईद प्रा पदवीधर गेवराई तालुका कार्याध्यक्ष आदींसह प्रहार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**माझ्या जीवाला धोका....**

उल्लेख असून, असे धक्कादायक संवाद असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

देशमुख यांनी सांगितले की, त्यांच्या सुरक्षेबाबत खा. बजरंग सोनवणे यांनी पोलिसांना ३० तारखेला पत्र दिले असून, या पत्रात प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड व स्वतः दिपक देशमुख यांची नावे आहेत. मात्र, पोलिस प्रशासनाने याची कोणतीही दखल घेतली नसल्याचा आरोप त्यांनी केला. पोलिस सुद्धा आ. धनंजय मुंडे यांच्या दबावाखाली काम करत आहेत असा गंभीर आरोप करत त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

स्ट्रॉंग रूममध्ये अधिकाऱ्यांची ये-जा सुरू असून, त्यांना तिथे जाण्याचा अधिकार आहे का ? स्ट्रॉंग रूमची निगराणी कोणाच्या हातात आहे ? असे सवाल उपस्थित करत संपूर्ण यंत्रणा दबावाखाली काम करत असल्याचा संशय आहे असे देशमुख म्हणाले. या सर्व प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करत आ. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांची सीडीआर काढून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी दिपक रंगनाथ देशमुख यांनी केली आहे. सीडीआर चौकशीतून आतापर्यंत घडलेल्या सर्व घटना उजेडात येतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यापत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड, तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, मुक्ताराम गवळी, आबसाहेब देशमुख आदी उपस्थित होते.

## संतोष दाणी यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर

आष्टी (प्रतिनिधी)

मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद आष्टी यांच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना आदर्श जिजाऊ माँसाहेब पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षीच्या पुरस्कारामध्ये जि. प. कें. प्रा. शा. शिराळ शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक संतोष दाणी यांना यावर्षीचा जिजाऊ माँसाहेब आदर्श मुख्याध्यापक २०२६ पुरस्कार जाहीर झाला असून मान्यवरांच्या हस्ते लवकरच पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याचे निवड समितीने कळवले आहे.

संतोष दाणी यांनी सामाजिक कार्याबरोबरच गेली पस्तीस वर्ष शैक्षणिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करत अनेक विद्यार्थी घडविले आहेत. शालेय गुणवत्तेबरोबरच समाजाच्या सहभागातून त्यांनी आजपर्यंत वस्तू रुपाने व रोख स्वरूपात जवळपास दहा ते बारा लाखाचा निधी यावर्षी जमा केला असून शालेय साहित्य ही विद्यार्थ्यांना वाटप केले आहे. पालक व विद्यार्थी यांचे वाढदिवस साजरे करताना व्यर्थ खर्चाला फाटा देऊन शाळेला राष्ट्रीय नेत्यांचे फोटो, पितळी घंटा विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसन पट्ट्या, शुद्ध पाणी पिण्यासाठी एक्वा त्याचबरोबर एलईडी टीव्ही, वाचनालयासाठी कपाट, वर्गामध्ये आरसे, घड्याळे खुर्च्या इत्यादी साहित्य समाजाच्या सहभागातून मिळविले आहे. शालेय परिसरात वृक्षारोपण करून शालेय परिसराचे सुशोभीकरण केले आहे. समाजाच्या सहभागातूनच शाळेला रंगरंगोटी केली असून शालेय वर्ग सजावट सुशोभीकरण केले आहे. त्याचबरोबर शाळेमध्ये महिला मेळाव्याचे आयोजन, शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता विकास, विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी, माझी शाळा सुंदर शाळा, माझे सुंदर कार्यालय, जागतिक महिला दिन उपक्रम, शिक्षणाची वारी यासारख्या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी बरोबरच पल्स पोलिओ, वृक्षारोपण, जनगणना यासारख्या राष्ट्रीय कार्यात सहभाग घेतला आहे.

त्यांच्या या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना भारत जीवन गौरव, पद्मपाणि प्रतिष्ठानचा आदर्श शिक्षक पुरस्कार, संत गाडगेबाबा गुणवंत कर्मचारी पुरस्कार, मनसेचा मराठी भूषण पुरस्कार, शक्ती प्रतिष्ठानचा आदर्श पुरस्कार विविध संस्थांचे २१ कोरोना योद्धा व समाजसेवक पुरस्कार, बीड जिल्हा पत्रकार संघाचा आदर्श पुरस्कार, गंगाई बाबाजी प्रतिष्ठानचा आदर्श पुरस्कार, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेचा आदर्श पुरस्कार असे विविध संस्थेचे जवळपास ४० आदर्श पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार



परिषदेचे विधिज्ञ सिताराम पोकळे यांनी संतोष दाणी यांच्या पुरस्काराची घोषणा नुकतीच केली असून त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल आष्टी तालुक्याच्या कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी श्रीमती सीमा काळे, शिराळ केंद्राचे केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेश कुमार शिंदे, जगन्नाथ भगत, शहाजी तोतरे, प्रल्हाद खाडे, श्रीमती मंगल झगडे, श्रीमती गीता शेकडे, श्रीमती निलोफर खान, श्रीमती पद्मिनी चव्हाण, धर्मनाथ शिंदे, सतीश शिंदे, ह. भ. प. आदिनाथ दानवे, पत्रकार अविनाश कदम, बा. म. पवार, अमोल जगताप, राजेंद्र लाड, दादा पवळ, प्रा. सय्यद अल्लाउद्दीन, सरपंच ज्ञानेश्वर जगताप, शरद आजबे, केशवराव आजबे आदिसह केंद्रातील सर्व शिक्षक बंधू - भगिनींनी अभिनंदन केले आहे.

# अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या पॉक्सो प्रकरणात आरोपीस जामीन

## मा.सत्र न्यायालयाचा दिलासा, अँड.योगेश टेकाडे पाटील यांचा प्रभावी युक्तिवाद

बीड ।प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड येथे नोंद असलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या (झजउडज -लीं अंतर्गत) गंभीर प्रकरणात मा. सत्र न्यायालय, बीड यांनी आरोपीस जामीन मंजूर करून महत्त्वपूर्ण दिलासा दिला आहे. या प्रकरणात आरोपी अमोल बाबूराज तेल्हारकर याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता तसेच पॉक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यात आरोपीस दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतर आरोपी न्यायालयीन कोठडीत होता. तपासाच्या प्राथमिक टप्प्यात आरोपीचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला होता, कारण त्या वेळी तपास पूर्ण झालेला



नव्हता.त्यानंतर पोलीस तपास पूर्ण होऊन चार्जशीट दाखल करण्यात आली. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीतर्फे दिनांक ०४ डिसेंबर २०२५ रोजी नियमित जामिन अर्ज मा. सत्र न्यायालय, बीड येथे दाखल करण्यात आला.या जामिन अर्जावर सुनावणी दरम्यान आरोपीच्या वतीने अॅड. योगेश टेकाडे पाटील यांनी अत्यंत सखोल, कायदेशीर आणि वस्तुनिष्ठ युक्तिवाद केला.आरोपीची पुढील कोठडी आवश्यक नाही, कारण तपास पूर्ण झालेला आहे आणि चार्जशीट दाखल करण्यात आलेली आहे, हे स्पष्टपणे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.अँड.टेकाडे यांनी युक्तिवादात महत्त्वाच्या बाबी अधोरेखित केल्या. यामध्ये प्रामुख्याने फिर्याद दाखल करण्यात ४४ दिवसांचा मोठा विलंब आहे, ज्यामुळे फिर्यादी कथनाच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. तसेच वैद्यकीय तपासणी अहवालामध्ये लैंगिक अत्याचाराबाबत कोणताही ठोस निष्कर्ष नसून फक्त ीी- ीळलळश्रळीं लरपपीं लश ीींश्रशव ीीं असे नमूद आहे.

आरोपी परभणी येथील कायमस्वरूपी रहिवासी असून समाजात त्याचा ठराविक पत्ता आहे, त्यामुळे तो फरार होण्याची शक्यता नाही, तसेच तो न्यायालयाने घालून दिलेल्या सर्व अटी पाळण्यास तयार आहे, हेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.आरोपी १३ सप्टेंबर २०२५ पासून दीर्घ काळ न्यायालयीन कोठडीत असल्याने, केवळ शिक्षा होण्यापूर्वीच दीर्घ कारावास अन्यायकारक ठरतो, हा मुद्दा देखील प्रभावीपणे मांडण्यात आला.या सर्व कायदेशीर बाबी, कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादांचा विचार करता मा. सत्र न्यायालय, बीड यांनी दिनांक ०४ डिसेंबर २०२५ रोजी आरोपीस अटींसह जामीन मंजूर केला.या महत्त्वपूर्ण जामिन प्रकरणात आरोपीच्या बाजूने अँड. वैभव होळकर व अँड. देविदास राठोड यांनीही मोलाचे सहकार्य केले.

# तडखेलमध्ये सिलेंडरचा स्फोट

## घर भस्मसात साडेसात लाखांचे नुकसान

देगलूर ।प्रतिनिधी

देगलूर तालुक्यातील तडखेल गावात ६ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट होऊन एका कुटुंबाचे घर जळून खाक झाले. या दुर्घटनेत जवळपास साडेसात लाख रुपयांचे प्रचंड नुकसान झाले असून सर्वांत दिलासादायक बाब म्हणजे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

राजाबाई हनुमंत बत्तलवाड यांच्या घरात हा स्फोट झाला. घरात ठेवलेले जीवनावश्यक साहित्य, कपडे, धान्य, भांडीकुंडी यांसह तब्बल ९५ हजार रुपये रोख जळून नष्ट झाले. याशिवाय सुमारे साडेतीन लाख रुपयांचे दागिने कानातील सोन्याच्या कुड्या, चांदीचे वाळे, चांदीची चैन, दीड तोळा सोने, ५ ग्रॅमची अंगठी-यांचे पूर्ण नुकसान झाले.आगीत आधार कार्ड, बँक पासबुक, शाळेची प्रमाणपत्रे यांसारखी आवश्यक कागदपत्रेही राख झाली. आग लागल्यानंतर गावकऱ्यांनी तत्काळ धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, अग्निशामन दलाची गाडीही



घटनास्थळी दाखल झाली. परंतु तोपर्यंत संपूर्ण घर जळून खाक झाले होते.देगलूर तहसील कार्यालयातील मंडळ अधिकारी बालीपोंगल आणि तलाठी रवी कापसे यांनी गावकऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा केला असून नुकसानभरपाईसाठी पुढील प्रक्रिया सुरू आहे.

# बुधवार पासुन मुक्रमाबाद येथील विठ्ठल मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील विठ्ठल मंदिरात प्रति वर्षा प्रमाणे याहीवर्षी विठ्ठल मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१०-१२-२०२५ रोज बुधवार पासुन प्रारंभ होत असुन १७-१२-२०२५ रोज बुधवारी सांगता आहे. वै.ह.भ.प.धोंडोपंत दादासाहेब व ह.भ.प. गुंडामहाराज चांदेगावकर यांच्या कृपा आशिर्वादाने व वेदांत केसरी ब्र.भु.श्री संत रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या ५६ व्या पुण्य स्मरणार्थ श्री भगवन्नाम संकीर्तन महोत्सव संपन्न होत आहे. यानिमित्त मुक्रमाबाद व परीसरातील भाविकांनी सप्ताहात सहभाग घेऊन ज्ञान प्रसादाचा लाभ घ्यावा.अशी विनंती अनंत सावकार पंदिलवार, प्रकाश पंदिलवार, संजय पंदिलवार ,नामदेव काळे यांनी केली आहे.अखंड हरिनाम सप्ताहातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे- पहाटे ०४ते ०६ काकडा, सकाळी १० ते ०१ गाथाभजन, सांय.०४ ते ०५प्रवचन , सांय.०६ ते ०७हरिपाठ, रात्री ०९ते ११ हरिकिर्तन सेवा, १२ ते ४ पहाटे हरिजागर किर्तनकार ह.भ.प. निवृती महाराज रावीकर, ह.भ.प. अनिरुध्द महाराज बाराळीकर, ह.भ.प.कृष्णदास महाराज सताळा, ह.भ.प.बंडा महाराज अलगरवाडी, ह.भ.प.पांडुरंग महाराज कोकाटे अंबेजोगाई, ह.भ.प.संगय्याप्पा स्वामी मदनुर, ह.भ.प.भगवान महाराज महळंगीकर, ह.भ.प.पदमाकर महाराज देशमुख अमरावती,



यांचे कीर्तन सेवा संपन्न होनार आहे. मृदंगवादक हे.भ.प. ऋषिकेश पाटील बेळेकर ह.भ.प.पांडुरंग काळे,ह.भ.प.चंद्रकांत पांचाळ, विनेकरी ह.भ.प.वैजनाथ महाराज खेर्डा, गायनाची साथ ह.भ.प.व्यंकटराव महाराज एकलारा श्री ह.भ.प.माधव पांचाळ मारवाडी श्री ह.भ.प.श्री षिकेश पाटील बेळीकर हे उपस्थित राहणार आहेत.असे मंदिराचे पुजारी अनंतु महाराज जोशी यांनी या सप्ताहात सहभागी होऊन भक्ती ज्ञान व प्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी सर्व भक्तांना केली आहे.

# देगलूर पोलीस उपविभागात नवीन मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे उद्घाटन

देगलूर ।प्रतिनिधी

देगलूर शहरातील पोलीस उपविभागीय कार्यालयात ७ डिसेंबर रोजी नवीन मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी पोलीस उपविभागीय अधिकारी संकेत गोसावी, कार्यालयातील कर्मचारी तसेच स्थानिक पत्रकार उपस्थित होते.

सात वर्षांवरील सर्व गुन्ह्यांमध्ये एफएसएल टीमच्या उपस्थितीत तपासणी करणे अनिवार्य ठरल्यामुळे, जिल्ह्यातील देगलूर, बिलोली आणि कंधार



पोलीस उपविभागासाठी नवीन मोबाईल फॉरेन्सिक गाडी उपलब्ध झाली आहे. या व्हॅनमध्ये एकूण १८ किट असून, सायबर गुन्हे, सामान्य तपासण्या, नारकोटिक्स प्रकरणे, रेप प्रकरणे यासह सर्व प्रकारच्या फॉरेन्सिक तपासण्या करता येतात.

कर्मचार्यांनी सांगितले की, रेप प्रकरणांमध्ये घटनास्थळी जाऊन नमुने घेणे, सीमन आणि सलायवा तपासणे, तसेच मानव आहे की प्राणी हे निश्चित करणे या सुविधा वापरता येतात. सायबर गुन्ह्यांमध्ये नेटवर्क ब्लॉक करणे, डेटा कॉपी करणे आणि पोलीसांना प्रदान करणे शक्य आहे.

या व्हॅनमध्ये आठ तज्ज्ञांची टीम कार्यरत असून, ती जिल्ह्यात विविध ठिकाणी फॉरेन्सिक तपासणी करते. उपस्थित कर्मचाऱ्यांनी संपूर्ण उपकरणाची कार्यपद्धती कार्यक्रमात सविस्तर सांगितली.पोलिस उपविभागीय अधिकारी संकेत गोसावी यांनी माहिती दिली की, मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनच्या माध्यमातून पोलिसांना घटनास्थळी जलद व परिणामकारक फॉरेन्सिक तपासणी करण्यास सक्षम होणार आहे.

# बालसभेचे आयोजन करुन गुरुनानक प्राथमिक विद्यालयात महामानवांना अभिवादन

बीड ।प्रतिनिधी

श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी सांगवी तालुका केज जिल्हा बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालय शाहू नगर बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन विद्यार्थ्यांनी बालसभा घेऊन साजरा केला.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन तसेच स्त्रियांचे उद्धारकर्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यासाठी गुरुनानक प्राथमिक विद्यालय बीड येथील विद्यार्थ्यांनी बाल सभा आयोजित करून अनोख्या पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांना अभिवादन केले. माझी शाळा - माझी जबाबदारी हा विषय यावेळच्या बाल सभेचा विषय होता. बाल सभेची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांनी पार पाडली. कार्यक्रमाचे अध्यक्ष, अतिथी, व्यवस्थापक,



सूत्रसंचालक आणि आभार देखील विद्यार्थ्यांनीच मानले. प्रतिमापूजन केल्यानंतर शाळेत पुष्पवृक्षांचे रोपण करून अनोख्या पद्धतीने कार्यक्रमाचे उदघाटन केले.विद्यार्थ्यांनीच अतिथीपदी विराजमान विद्यार्थ्यांचा फुले देऊन सत्कार केला. डोंगरे मॅडम यांनी प्रस्ताविक करत कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली.

विद्यार्थ्यांसह सर्वांनी विविध विषयांवर उत्साहाने आपली मनोगते व्यक्त केली. यात कु. शेळके आरोही, जाधव समीक्षा, शेंडगे सई, पव्हणे आदिरा, गदळे अनुश्री, स्वामी अनुजा, काळे शुभांगी, जाधव अमृता, चि. चिरखे शिवराज, सपकाळ देवेश, भोसले भार्गव, बागवान जिशान, शहाणे समर्थ, स्वामी वैभव, जाधव संग्राम, काळे आदित्य यांचा समवेश होता.

यात विशेष लक्षवेधी भाषण कार्यक्रमाच्या अध्यक्षाचे झाले. ठरावाचे वाचन अध्यक्ष अनुष गदळे याने केले. कार्यक्रमाचा अत्यंत हृदयस्पर्शी भाग म्हणजे गेली २५ वर्षे शाळेत बालवाडीचा वर्ग चालावणाऱ्या आणि शाळेला आकार व आधार देणाऱ्या हांगे मॅडम यांचा निरोप. यावेळी शाळेने त्यांचा यथोचित सन्मान केला आणि दाटल्या कंठाने व साश्रू नयनाने त्यांना निरोप देत भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. फलक लेखन व पोस्टर बनवण्याच्या कामी त्यांना ठोकरे सरांनी मदत केली. सृष्टी आंधळे आणि संजना जापडिया यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन केले तर आभार कु. शेख मुस्कान हिने मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले तर श्री गदळे सर, श्रीमती पव्हणे मॅडम,, श्रीमती मुंडे मॅडम, श्री तांदळे सर, शेळके मॅडम

# नाईन साईट राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा थाटात संपन्न !

बीड ।प्रतिनिधी

नाईन साईट राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडली. जिल्हा स्टेडियमवर झालेल्या या स्पर्धेला राज्यभरातून आलेल्या संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रेक्षकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंचा जोश वाढवला. या स्पर्धेसाठी राज्यातून दहा टीमने सहभाग नोंदविला होता. स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास मान्यवरांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. स्पर्धेच्या पहिल्या फेरीपासूनच संघांमधील संघर्ष चुरशीचा दिसून आला. जलद आक्रमणे, भक्कम बचाव आणि गोलरक्षकांची चुरचुरीत कामगिरी यामुळे प्रत्येक सामना रंगतदार झाला.

मुलांच्या संघामध्ये अंतिम सामना बीड आणि ठाणे संघामध्ये झाला बीडच्या टीमने ठाणे संघावर दोन गोल करून हा अंतिम सामना जिंकला आणि मुलींच्या संघामध्ये अंतिम सामना बीड आणि लातूर संघामध्ये झाला बीडच्या टीमने लातूर संघावर दोन गोल करून हा अंतिम सामना जिंकला. अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी उच्च दर्जाचा खेळ सादर करत प्रेक्षकांची




मने जिंकली. अखेरीस रोमांचक खेळानंतर विजेत्या संघाने विजेतेपद पटकावत ट्रॉफी आपल्या नावे केली. उपविजेत्या संघानेही दमदार खेळ करत प्रेक्षकांची दाद मिळवली.स्पर्धेच्या शेवटी विजेते व उपविजेते संघ तसेच उत्कृष्ट खेळाडू आणि उदयोन्मुख खेळाडूंना विशेष पुरस्कार व पदके देऊन गौरविण्यात आले. नाईन साईट राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, राज्यस्तरावरील फुटबॉल प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. पुढील वर्षी ही स्पर्धा अधिक भव्य स्वरूपात आयोजित करण्याची माहिती त्यांनी दिली. या अंतिम सामन्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गढी येथील शिवशारदा पब्लिक इंग्लिश स्कूलचे उपप्राचार्य शेख तारेख सर, नाईन साईट फुटबॉल असोसिएशन महाराष्ट्राचे सचिव इंगोले सर, शेख खमर सर (बीड पोलीस) द स्कूल एक्सप्रेस चे संपादक शेख एजाज, जमील बागवान सर यांची उपस्थिती होती. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शेख अफरोज सर यांच्या मार्गदर्शनात शेख एजाज, अब्दुल खदीर सैफ मणिआर, अमान भाई, दानिश भाई, शेख शायान यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इम्रान सर आणि आभार प्रदर्शन शेख अफरोज सर



## महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

मुखेड ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंद्री (प.दे) ता मुखेड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास मुख्याध्यापक,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## के.एस.पी. विद्यालय बीड येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

बीड ।प्रतिनिधी

दि.०६/१२/२०२५ रोजी के.एस.पी. विद्यालय, बीड येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुण्यस्मरण निमित्त अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरवात केली. या कार्यक्रमामध्ये मुलांना बाबासाहेबांच्या समाज कार्या विषयी धडे देण्यात आले. यावेळी मुलांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती सौ.अंजलीताई शेळके, श्री. ऋषिकेशजी शेळके, (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख), शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.

## तुलसी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



बीड ।प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शनिवार, दि. ०६ रोजी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमास प्राचार्य डी.जी. निकाळजे व आयक्यूएसी समन्वयक डॉ. योगिता लांडगे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य निकाळजे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पुष्पांजली अर्पण करून बाबासाहेबांना अभिवादन केले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाची, त्यांच्या संविधान निर्मितीतील व सामाजिक परिवर्तनातील योगदानाची माहिती देण्यात आली. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन शिक्षण, समानता आणि सामाजिक बांधिलकीच्या दिशेने कार्य करण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला.

# प्रदीप गायकवाड यांचा सत्कार ; माहिती अधिकार चळवळीत केजला मिळाले नवे नेतृत्व

केज/प्रतिनिधी

दि.०७ डिसेंबर रोजी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या केज तालुका अध्यक्षपदी श्री.प्रदीप गायकवाड यांच्या निवडीचा जाहीर सत्कार समारंभ रविवारी शासकीय विश्रामगृह केज येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते,आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य व्यक्ती तसेच राजकीय व व्यावसायिक क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान किसान सेल चे बीड जिल्हाध्यक्ष सी.बी.एस.इनामदार यांनी भूषवले.त्यांनी आपल्या मनोगतातून गायकवाड यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.त्यांनी म्हटले की, माहिती अधिकार हा सामान्य माणसासाठी प्रशासनापर्यंत पोहोचण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे.समाज हिताचे प्रश्न निर्भीडपणे मांडणे,पारदर्शक प्रशासनाचा ध्यास घेणे आणि सर्वसामान्य नागरिकांचा आवाज बनणे हीच खरी लोकशाहीची ताकद आहे. प्रदीप गायकवाड यांची निवड ही केज तालुक्या साठी गौरवाची बाब आहे. त्यांच्या नेतृत्वातून माहिती अधिकार चळवळ नक्कीच बळकट होईल, असे इनामदार यांनी



सांगितले.तसेच त्यांनी शेतकरी,युवक आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर कार्य करण्यासाठी संघटनांना बांधील राहण्याचे आवाहनही केले.प्रारंभी उपस्थितांचे स्वागत व कार्यक्रमाची रूपरेखा सूत्रसंचालक श्री.पांडुरंग कसबे यांनी उलगडली.यावेळी नुकत्याच झालेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त त्यांना अभिवादन व्यक्त करून उपस्थितांना सामाजिक बांधिलकीची आठवण करून दिली. यानंतर आंबेडकरी चळवळीत सक्रिय असलेले युवक नेते अशोकजी गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी नव्याने निवड झालेल्या श्री.प्रदीप गायकवाड यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा केजचे तालुकाध्यक्ष श्री.चंद्रकांत पाटील यांनीही आपले विचार मांडत माहिती अधिकाराच्या माध्यमातून लोकशाही बळकट होत असल्याचे सांगितले.

डॉ.अजय कदम यांनी मनोगत व्यक्त करताना माहिती अधिकाराचा सदुपयोग करून प्रशासनात पारदर्शकता आणणे आवश्यक असल्याचे प्रतिपादनकेले. सामान्य नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी माहिती अधिकार ही एक प्रभावी साधन आहे,अशा शब्दांत त्यांनी गायकवाड यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पत्रकार अनिल वैरागे यांनी केले.या प्रसंगी सतीश बनसोडे, सतीश खळगे,नंदकुमार मिसाळ,संजय लोंढे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते,आंबेडकरी चळवळीतील मान्यवर, माहिती अधिकार क्षेत्रातील प्रतिनिधी, व्यापारी व राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमामध्ये समाजहिताचे अनेक मुद्दे साधक-बाधक चर्चेतून समोर आले.सत्कार कार्यक्रम संपल्यानंतर सर्व उपस्थितांनी केज नगरपंचायतच्या अध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड यांचे चिरंजीव श्री.विवेक बनसोडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.त्यानंतर स्थानिक समस्यांबाबत व सामाजिक उपक्रमांबाबत चर्चा झाली.मैत्रीपूर्ण वातावरणात या भेटीचा समारोप करण्यात आला.

गायकवाड यांच्या निवडी निमित्त झालेला हा सत्कार कार्यक्रम आणि त्यानंतरचा वाढदिवस समारंभ या दोन्ही कार्यक्रमांनी केज तालुक्यात सामाजिक ऐक्य आणि पारदर्शक प्रशासनाच्या बांधिलकी चा संदेश दिला आहे.



# केज शहरातील सिनीयर क्रिकेटपटूंचे स्नेह मिलन, निसर्गाच्या कुशीत रंगला जुन्या आठवणींचा 'सामना'!

केज/प्रतिनिधी

क्रिकेटच्या मैदानावर आपल्या जबरदस्त खेळीने केज शहराची शान वाढवणाऱ्या सिनीयर क्रिकेट खेळाडूंचे एक आगळेवेगळे आणि उत्साहाचे स्नेह मिलन नुकतेच निसर्गाच्या रमणीय सानिध्यात पार पडले.या स्नेह मिलनात केज शहराच्या जुन्या जाणत्या आणि आपल्या काळात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या खेळाडूंनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला,ज्यामुळे एका खास खेळीमेळीच्या वातावरणाची निर्मिती झाली.स्नेह भोजनाचा आस्वाद व आठवणींना उजाळा हा सोहळा केज शहरातील ज्येष्ठ खेळाडू शेख जफर यांच्या शेतात मोठ्या उत्साहात पार पडला.सर्व खेळाडूंनी एकत्र येत स्नेह भोजनाचा मनमुराद आस्वाद घेतला. विशेषतः क्रिकेटच्या मैदानावरच्या थरारक क्षणांची आणि त्या काळात केलेल्या गमती जमतींची चर्चा रंगली, ज्यामुळे उपस्थितांमध्ये जुन्या काळाच्या आठवणींनी समा बांधला.

उपस्थित सिनीयर खेळाडू

या स्नेह मिलन उत्सवाला केज शहराचे अनेक नामांकित सिनीयरखेळाडू उपस्थित होते,ज्यांनी आपल्या खेळाच्या माध्यमातून केज शहराचे नाव मोठे केले आहे. यामध्ये अकबर इनामदार, प्रकाश मुंडे,शेख सिद्दीक भाई,अजिमभाई इनामदार,विजय आरकडे, मनोज मस्के,चांद कादरी, डॉ.शशी केंद्रे,प्रेमजीत हजारे,नय्युम मौजन,बंडू मस्के,विनोद गुंड,ड. भागवत ढाकणे,फशी मौजण,शेख जफर,शेख पाशाभाई,शिवाजी घुले, अप्पा हजारे,प्रशांत जाधव,नय्युम मौजन, ताहेर मुल्लासाब, मुजफ्फर सय्यद,अंकुश राऊत,रवि औटी,शेख खय्युम यांच्यासह अनेक जुने जाणते व उत्कृष्ट खेळाडू हजर होते.या सर्व सिनीयर क्रिकेटखेळाडूंनी एकमेकांचे अलीकडील जीवनमान आणि अनुभव जाणून घेतले.भविष्यात अशा प्रकारचे स्नेह मिलन नियमितपणे आयोजित करण्यावरही यावेळी चर्चा झाली,जेणेकरून मैदाना बाहेरील हे खास नाते अधिक दृढ होईल.

# भवरवाडी जिल्हा परिषद शाळेत पद्मश्री पुरस्कार प्राप्त अच्युत पालव यांची दोन दिवसीय सुलेखन कार्यशाळा उत्साहात संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील भवरवाडी येथे भारतीय सुलेखनकलेचे प्रख्यात जनक आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित अच्युत पालव यांनी शनिवार आणि रविवार या दोन दिवसांत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सुलेखन व हस्ताक्षर सुधारणा कार्यशाळा घेतली. कॅलिग्राफी या कलेला जागतिक पातळीवर लोकप्रिय करण्यामध्ये मोठा वाटा असलेल्या पालव यांनी विद्यार्थ्यांना सुलेखनाचे बारकावे, भारतीय लिपींचे सौंदर्य आणि हस्ताक्षर सुधारण्याच्या विविध तंत्रांची सखोल माहिती दिली. यावेळी त्यांच्या समवेत श्रीमती श्रद्धा पालव, श्रीमती तेजस्विनी भावे या देखील उपस्थित होत्या.

चार दशकांहून अधिक काळ भारतीय लिपी व सुलेखनाची सेवा करणारे अच्युत पालव यांनी या कार्यशाळेत मुलांशी प्रत्यक्ष संवाद साधत सुलेखनाची मूलभूत तत्त्वे, अक्षररचना, रेषा नियंत्रण, विविध लेखणींचा वापर, तसेच सौंदर्यपूर्ण अक्षरनिर्मितीचे अभ्यासपूर्ण प्रात्यक्षिक दाखवले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध लिप्यांचे प्रयोग करून आपली सर्जनशीलता अनुभवली. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना सुलेखनाच्या कलेची



ओळख करून देणे, त्यांच्या हस्ताक्षरात सुधारणा घडवून आणणे आणि भविष्यात शिक्षणासह इतर क्षेत्रांमध्येही या कौशल्याचा फायदा व्हावा हा होता. कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती पाहायला मिळाली आणि अनेकांनी प्रथमच अनुभवल्या जाणाऱ्या या कलेबद्दल मोठा उत्साह व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या शेवटी पालव यांनी विद्यार्थ्यांच्या कामाचे कौतुक करत त्यांना सातत्याने सराव करण्याचे आणि आपल्या अक्षरांमधून स्वतःची ओळख निर्माण करण्याचे प्रेरणादायी संदेश दिले. शाळेच्या शिक्षकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत अच्युत पालव यांचे मनःपूर्वक आभार मानले.या दोन दिवसीय कार्यशाळेमुळे भवरवाडी येथील विद्यार्थ्यांना सुलेखनकलेची अनोखी ओळख मिळाली असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात आणि शिक्षणात त्याचा सकारात्मक परिणाम होणार असल्याचे मत उपस्थित पालकांनी व्यक्त केले.

यावेळी सरपंच भरत भवर, संतोष भवर, संजय भवर, राम भवर, संतोष मोरे, हंसराज महाराज, जालिंदर भवर, अशोक भवर, शरद बागल, सतीश भवर, सचिन भवर, शिवाजी भवर, रोहन भवर, महेश भवर, जयेश भवर, सागर भवर, तुळशीराम भवर, सार्थक भवर, पोपट भवर शाळेचे मुख्याध्यापक सुनिल काकडे सर, अनिल बेंद्रे पत्रकार उत्तम बोडखे, नगरसेवक दीपक निकाळजे, राजेंद्र लाड, सचिन रानडे, शरद गर्जे आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा धामणगावच्या गाईड पथकाचा लखनऊमध्ये डंका

## राष्ट्रपतींना मानवंदना देत धामणगावचे विद्यार्थी राष्ट्रीय जांबोरीत चमकले

आष्टी (प्रतिनिधी)

लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे दिनांक २३ ते २९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान पार पडलेल्या डायमंड जुबली ग्रँड फिनाले व १९ व्या राष्ट्रीय स्काऊट गाईड जांभोरीत धामणगावच्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेने राज्याचे उत्कृष्ट प्रतिनिधित्व करत चमकदार यश मिळवले आहे.

या जांभोरीत संपूर्ण भारतासह परदेशातील स्काऊट - गाईड सहभागी होते. या भव्य कार्यक्रमाच्या उद्घाटनास उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदी बेन पटेल तसेच शेकोटी कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. तर समारोप समारंभाची शान वाढवत भारताच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते स्काऊट - गाईडला मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात आले. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा धामणगाव साठी अभिमानाची बाब म्हणजे या शाळेचे विद्यार्थी राष्ट्रपतींना मानवंदना देण्यासाठी सहभागी झाले.

यामध्ये श्रावणी अशोक चौधरी, राजनंदिनी निलेश लोखंडे, सानिका संभाजी झिंजुर्के, समृद्धी सतीश लोखंडे, कृष्णा उद्धव लोखंडे, समृद्धी परसराम




लोखंडे, समृद्धी बुवा साहेब महाजन, परी महादेव झिंजुर्के, समृद्धी ज्ञानेश्वर लोखंडे या गाईड्स होत्या. त्याचप्रमाणे कॅम्प क्राफ्ट, शेकोटी सादरीकरण, शोभायात्रा, नाईट हाईक, संचलन बँड पथक, पयोनियरिंग प्रोजेक्ट, स्किल ओरामा, कलर पार्टी, महाराष्ट्र डे, एडवेंचर प्रोजेक्ट, फिजिकल डिस्प्ले, फूड प्लाझा, तंबू सजावट व निरीक्षण अशा विविध उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्राचा मान उंचावला. या राष्ट्रीय जांबोरीत देशभरातील सर्व घटक राज्य व केंद्रशासित प्रदेशांमधून ३३००० स्काऊट - गाईड सहभागी होते. तसेच श्रीलंका, मालदीव, नेपाळ, संयुक्त आमिरात व सौदी अरेबिया या देशांची देखील सहभाग नोंद होती.

या उल्लेखनीय यशामुळे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा धामणगाव च्या गौरवशाली परंपरेत आणखी एक मानाचा तुरा जोडला गेला असून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा धामणगावच्या कर्तुत्वात भरीव वाढ झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या उत्तुंग कामगिरीमुळे संपूर्ण आष्टी तालुक्याचा अभिमान वाढला आहे. केंद्रीय प्राथमिक शाळा धामणगावच्या गाईड विभाग प्रमुख श्रीमती लोखंडे पुष्पा यांच्या मार्गदर्शनाखाली हे नेत्र दीपक यश विद्यार्थ्यांनी मिळवले आहे तर त्यांच्या या राष्ट्रीय पातळीवरील सहभाग यशस्वी होण्यासाठी, प्रवासासाठी स्काऊट मास्टर प्रमोद धुर्वे आणि कडा केंद्रीय शाळेचे स्काऊट मास्टर बा. म. पवार सर यांनी सहकार्य केले. धामणगावच्या विद्यार्थिनींना जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा शिक्षणाधिकारी तथा गाईड आयुक्त श्रीमती पाटील मॅडम व जिल्हा संघटक योगेश आवढाळ, गटशिक्षणाधिकारी श्रीमती सीमा काळे, मुख्याध्यापक हिरामण पोकळे यांनी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल व या राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात आले.



बीड - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी शहरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना नितीन जायभाये, साक्षी जोगदंड, समता जोगदंड,डी.जी. तांदळे, बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे आदी उपस्थित होते.

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना असंख्य अनुयायींनी कॅण्डल रॅलीने केले अभिवादन

माजलगाव ।प्रतिनिधी

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त माजलगाव शहरात अभिवादन रॅली तसेच भव्य कॅण्डल रॅलीचे आयोजन भारतीय बौद्ध महासभा व क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून अभिवादन रॅलीची सुरुवात झाली.सदरची रॅली सांची बौद्ध विहार,केसापुरी कॅम्प येथे पोहोचली व तेथे बौद्ध वंदना घेऊन रॅलीची सांगता करण्यात आली.तर सायंकाळी ७ वाजता स्व. सुंदरराव सोळंके महाविद्यालय,माजलगाव येथून भव्य कॅण्डल रॅलीला शांततेत सुरुवात झाली. हातात प्रज्वलित मेणबत्त्या घेऊन हजारो महिला,युवक आणि ज्येष्ठ नागरिक सहभागासाठी पुढे आले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सर्वांनी बुध्दवंदना घेऊन महामानवांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.



# माजलगावात महामंडलेश्वर श्री श्री १००८ प.पु.मॉ.कनकेश्वरी देवीजी च्या सुमधुर वाणी मध्ये भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन

**भव्य शोभायात्रा ने शिव महापुराण कथाची सुरुवात करण्यात येणार आहे**

प्रतिनिधी, माजलगाव

माजलगाव येथील श्री.सदगुरु सत्संग गोसेवा समितीच्या वतीने कौशल्यादेवी बजाज मैदान,( मंगलनाथ ) बायपास रोड माजलगाव येथे श्री शिवमहापुरान कथेचे आयोजन करण्यात आले आहे. सु प्रसिद्ध शिवमहा पुराण कथाकार महामंडलेश्वर श्री.श्री. १००८प.पु.मॉ.कनकेश्वरी देवीजी यांच्या वाणीतुन दिनांक ८ डिसेंबर ते १६ डिसेंबर दुपारी २ ते ५ या वेळेत होणार आहे.या शिवमहापुराण कथेसाठी भव्य दिव्य मंडप,सजावट करण्यात आली आहे. मंडप मध्ये अतिथी साठी सोफे गाद्या, पत्रकार बांधवासाठी विशेष व्यवस्था व बाकी सर्वांसाठी खुर्च्यांची व्यवस्था केली आहे, कार्यक्रमास मराठवाड्यातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातुन माँ यांचा भक्त परिवार शिवमहापुरन कथा श्रवणासाठी येणार आहेत. या भक्तांची थांबण्याची तसेच चहा,नाश्ता,भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. या शिवमहापुराण कथे चें मुख्य यजमान श्री जुगलकिशोरजी लड्डा (टाकरवण ) हे आहेत. माजलगाव येथील संपूर्ण राजस्थानी समाज,शिवभक्त व गोसेवक यानी या कथेचे नियोजन केले आहे.तसेच या कथेच्या महाप्रसादाचे मुख्य यजमान राजेंद्र, पुरुषोत्तम, अशोक, गोविंद करवा ( डासाळा ) परिवाराच्या वतीने करण्यात येणार आहे. माजलगाव येथे पंचक्रोशीतील सर्व भाविकभक्तांनी या कथा श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री.सदगुरु सत्संग गोसेवा समितीच्या वतीने करण्यात आले



# समतेच्या विचारांचा प्रकाश - भारतीय बौद्ध महासभा व क्रांतिसूर्य संस्थेच्या रॅलीला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त माजलगाव शहरात अभिवादन रॅली तसेच भव्य कॅण्डल रॅलीचे आयोजन क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या दोन्हीही रॅलींना माजलगावातील हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून अभिवादन रॅलीची सुरुवात झाली. रॅली सांची बौद्ध विहार, केसापुरी कॅम्प येथे पोहोचली, जिथे प्रा. संजय बागुल यांनी प्रेरणादायी व्याख्यान दिले. नंतर बौद्ध वंदना घेऊन रॅलीची सांगता करण्यात आली.

सायंकाळी ७ वाजता स्व. सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथून भव्य कॅण्डल रॅलीला शांततेत सुरुवात झाली. हातात प्रज्वलित मेणबत्त्या घेऊन हजारो महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक सहभागासाठी पुढे आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सर्वांनी बुध्दवंदना घेऊन महामानवांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही, समानता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाला दिशा देणारा ठरत असून, या विचारांनी प्रेरित होऊन नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाल्याचे दृश्य सर्वत्र पाहायला मिळाले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवर, महिला मंडळ, युवक, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते आणि माजलगावकरांचे क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# नैसर्गिक अनुदान घोटाळ्याचा पर्दाफाश फरार तलाठी किरण जाधव अखेर गजाआड आर्थिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

## EOW टीमची दमदार कामगिरी

हा महत्त्वपूर्ण तपास मा.श्री. अजयकुमार बंन्सल,पोलीस अधीक्षक जालना,श्री.आयुष नोपाणी,अपर पोलीस अधीक्षक जालना,आणि श्री.सिध्दार्थ माने, प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना यांच्या कठोर मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

आजची ही दमदार कारवाई श्री. मिथुन घुगे,स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, तसेच पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे,समाधान तेलंग्रे,किरण चव्हाण,अंबादास साबळे,गजानन भोसले,सागर बावीस्कर,दत्ता वाघुंडे,विष्णु कोरडे,ज्ञानेश्वर खुने,रविंद्र गायकवाड,शुभम तळेकर,श्रेयस वाघमारे,चालक पाठक मेजर आणि महिला अंमलदार जयश्री निकम,निमा घनघाव,मंदा नाटकर यांनी यशस्वीरित्या पार पाडली.




अंबड /प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यात नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठीच्या कोट्यवधी रुपयांच्या शासकीय अनुदानात झालेल्या महाघोटाळ्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने एजथ आज एक अत्यंत महत्त्वाची आणि धडाकेबाज कारवाई केली आहे.या घोटाळ्यातील मुख्य आरोपींपैकी एक आणि गेल्या अनेक दिवसांपासून फरार असलेला तलाठी किरण रविंद्र जाधव याला छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली आहे.या अटकेमुळे आतापर्यंत अटक झालेल्या आरोपींची संख्या नऊ झाली असून, आर्थिक गुन्हे शाखेने या घोटाळ्याचा पर्दाफाश करण्याचा विडा उचलल्याचे स्पष्ट झाले आहे.काय आहे हा कोट्यवधींचा घोटाळा ?

अंबड आणि घनसावंगी तालुक्यात नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते.शासनाने वेळोवेळी जीआर काढून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी अनुदान जाहीर केले.मात्र,याच अनुदानाच्या याद्या अपलोड करण्याचे काम पाहणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमत करून, मोठ्या प्रमाणावर बोगस शेती नावावर नसलेले नावे यादीत घुसडवली. इतकेच नाही तर या बोगस नावांवर आलेली शासकीय अनुदानाची रक्कम त्यांच्याकडून परस्पर परत घेण्यात आल्याच्या धक्कादायक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाच्या सत्यता पडताळणीसाठी तातडीने चौकशी समिती गठीत केली होती.या चौकशी समितीच्या अहवालाने संपूर्ण प्रशासनात खळबळ उडवून दिली. अहवालानुसार एकूण २४० गावांमध्ये तब्बल रु. २४,९०,७७,८११/- चोवीस कोटी, नव्वद लाख, सत्तर हजार, आठशे अकरा रुपये इतक्या प्रचंड शासकीय रकमेचा अपहार झाल्याचे सिद्ध झाले.गुन्हा दाखल आणि तपासाची चक्रे गतिमान या गंभीर अहवालानंतर अंबड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजि.क्र.४५३/२०२५ अन्वये अनेक गंभीर कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.या गुन्ह्याचा तपास मा.पोलीस अधीक्षक जालना यांच्या आदेशानुसार आर्थिक गुन्हे शाखा,जालना यांच्याकडे सोपवण्यात आला.एजथ ने तातडीने तपासाची सूत्रे हाती घेत यापूर्वीच आठ आरोपींना अटक केली होती.फरार तलाठी अखेर जाळ्यात आज आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने फरार आरोपींच्या शोधासाठी विशेष मोहीम राबवली.याच मोहिमेदरम्यान सदर गुन्ह्यातील महत्त्वाचा फरार आरोपी नामे किरण रविंद्र जाधव वय ३६ वर्ष जो पानेगाव,ता.अंबड येथील तलाठी आहे आणि मूळचा देऊळगाव राजा जि.बुलढाणा येथील रहिवासी आहे तो छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद येथे लपून बसल्याची माहिती मिळाली.माहिती मिळताच एजथ च्या टीमने विजेच्या वेगाने छत्रपती संभाजीनगर गाठले आणि धडाकेबाज कारवाई करत तलाठी किरण जाधव याच्या मुसक्या आवळल्या या अटकेसह



## संघ शताब्दी वर्षानिमित्त कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलाचा नागपूर अभ्यास दौरा संपन्न

अंबड : येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई द्वारा संचलित कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलातील कर्मचाऱ्यांनी स्थानिक व्यवस्थापन समिती कार्यवाह मा.श्री. केदारजी मंत्री तसेच मुख्याध्यापक श्री.प्रदीपजी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार सेवा प्रमुख व सहल प्रमुख श्री.शरद माळोदे ,सहल सहप्रमुख श्रीमती.मेघा वायकोस यांच्या नियोजनानुसार संघ शताब्दी वर्षानिमित्त नागपूर अभ्यास दौरा पूर्ण केला.

या अभ्यास दौऱ्यामध्ये संघ मुख्यालय , संघाची पहिली शाखा लावली तो मोहितेंचा वाडा , आज पर्यंत मा.सरसंघचालकांना जेवढ्या भेट वस्तू मिळाल्या त्या वस्तूंचे संग्रहालय , कल्पतरू पुस्तक संग्रहालय , डॉ.हेडगेवार भवन , रेशीम बाग परिसरातील स्मृती भवन, डॉ हेडगेवार व प.पू.गोळवलकर स्मृती स्थळ इत्यादी ठिकाणी भेट देऊन डॉ. केशव बळीराम हेडगेवार व अन्य सर्व सरसंघचालक यांच्याविषयी अधिक माहिती घेतली.स्मृती स्थळांचे स्वागत कक्ष प्रमुख विकास तेलंग यांनी संघाची कार्यपध्दती , प्रशिक्षणाचे स्वरुप याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच श्रीमती.सुवर्णलता खानापूरकर यांनी

पूर्ण करेंगे हम सब केशव यह साधना तुम्हारी... हे पद्य गायन केले. शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री.प्रदीपजी जोशी यांनी पूजनीय डॉ. हेडगेवार यांच्या स्मारक व स्मृतिस्थळाविषयी तसेच सर्व परिसरा विषयी माहिती दिली. तसेच स्थानिक व्यवस्थापन समिती कार्यवाह यांनी आपणही पद्यातील ओळीप्रमाणे पूजनीय हेडगेवार यांनी केलेल्या साधनेला पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करूया व हे राष्ट्र परम वैभवापर्यंत नेण्यासाठी आपला हातभार लावावा असे म्हटले.

या अभ्यास दौऱ्यात शालेय व्यवस्थापन मंडळ कार्यवाह श्री.केदारजी मंत्री माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री.सुधाकर घायतडक, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी सहभाग घेऊन दोन दिवसीय अभ्यास दौरा आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# जालना जिल्हा परिषद प्रशासनाचा धडाकेबाज स्फोट

## सामाजिक कार्यकर्त्यांच्या तक्रारीवर विजेगती कारवाई पंचक समिती झपाट्याने मैदानात

५ दिवसांचा अल्टिमेटम अहवाल दिला नाही तर जबाबदारीची जंग जाहीर

जालना /प्रतिनिधी

जालना जिल्हा परिषद प्रशासनाने पुन्हा एकदा आपली कणखर खणखणीत आणि निर्भीड कार्यपद्धती सर्वांसमोर ठेवत धडाकेबाज प्रशासनिक स्ट्राईक केला आहे.सामाजिक कार्यकर्ते पंकज सुखदेव मंडलिक यांच्या गंभीर तक्रारीवर प्रशासनाने क्षणाचाही विलंब न करता कारवाई करत पंचक चौकशी समितीची स्फोटक नेमणूक केली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी थेट आदेश झाडला ५ दिवसांत अहवाल नाहीतर कडक कारवाई अटळ आणि जालना प्रशासन अक्षरश क्शन मोड मध्ये गेले

तक्रारीवर प्रशासनाचा विजेगती प्रतिसाद जिल्ह्यात खळबळ

ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार गैरव्यवहार अभियंता व अधिकाऱ्यांच्या भूमिकेतील गंभीर अनियमितता याबाबत २७ ऑक्टोबर रोजी पंकज मंडलिक यांनी दिलेल्या तक्रारीला प्रशासनाने प्राधान्यश्रेणी-१ मानत ताबडतोब चौकशीचे चक्र फिरवले.ही कारवाई पाहून नागरिकांमध्ये एकच चर्चा

जालना जिल्हा परिषद जागी झाली आणि थेट धडाक्यात

पंचक समितीची झंझावाती यादी अधिकाऱ्यांचे घाम फुटले

श्री.शिरीष द.बनसोडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (अध्यक्ष),श्री.उदयसिंग ध. राजपूत उपमुख्य कार्यकारी अधिकारी,श्री.सुधीर चारे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,श्री. अरुण शहाणे सह गटविकास अधिकारी,पंचायत विभाग

श्री.नरेंद्र नागलवाड विस्तार अधिकारी पंचायत समिती घनसावंगी,या पाचही अधिकाऱ्यांच्या टीमला आदेश

शिथिलता नको बहाणा नको अहवाल हवा वेळेतच

पंकज मंडलिक यांचा निर्धार आवाज उठवल्याने प्रशासन हादरलं सामाजिक कार्यकर्ते पंकज सुखदेव मंडलिक यांनी ग्रामपंचायतीतील गंभीर भ्रष्टाचार उजेडात आणत मोठा आवाज उठवला.निवडणूक काळात प्रशासनाने त्यांना उपोषण करू नका असे पत्र दिले तरी त्यांनी सामाजिक जबाबदारी म्हणून उपोषण स्थगित केले.

मात्र आता पंचक समिती नेमल्यानंतर पंकज मंडलिक यांची स्पष्ट भूमिका

चौकशी समिती ठीक आहे पण खरी ताकद कारवाईत दिसली पाहिजे भ्रष्टाचार कोणाचाही असो सहन केला जाणार नाही

पंकज मंडलिक सामाजिक कार्यकर्ते व जिल्हा अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद ५ दिवसांचा कडक अल्टिमेटम अहवाल उशिरा म्हणजे थेट कारवाई जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकरणाला दिली आहे.हाय-प्रायोरिटी टॅग

आणि स्पष्ट इशारा दिला आहे की अहवाल उशिरा जबाबदारी निश्चित कारवाई टाळता येणार नाही या आदेशानंतर संबंधित विभागांत आणि अधिकाऱ्यांत चांगलाच धुमाकूळ उडाला आहे. जामखेड सर्कल चे डोळे अहवालावर खिळले पुढील कारवाईची प्रतीक्षा जालना जिल्हा परिषद प्रशासनाच्या या धडाकेबाज हालचालीने संपूर्ण जिल्ह्यात चर्चा रंगली आहे.सर्वांचे लक्ष आता एकाच गोष्टीवर पंचक समितीचा अहवाल आणि त्यानंतर होणारी गाजलेली कारवाई सार्वजनिक हितासाठी ही कारवाई निर्णायक ठरेल अशी सर्वांची अपेक्षा. प्रशासनाचा निर्धार आणि कार्यकर्त्यांचा लढाऊ जिगर दोन्ही मिळून जालन्यात आता खऱ्या अर्थाने भ्रष्टाचाराविरुद्धचा कसोटीचा क्षण उभा राहिला आहे

## घुंगर्डे हादगाव येथे हरिनामाने कलशारोहण सोहळा संपन्न

अंबड/प्रतिनिधी

तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथील माऊली वारकरी शिक्षण संस्था आयोजित माऊली मंदीराचा कलशारोहण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कलशाचे पुजन एकनाथानंद भोलेबाबा यांच्या हस्ते माऊली कलशाचे पुजन करण्यात आले. गावात मिरवणूक काढण्यात आली. भक्ती मय वातावरण सर्व गाव हरिनामाने मंत्रमुग्ध झाले. वारकरी संप्रदायाचा पाऊलखाना जपणारा हा कार्यक्रम संत महंताच्या आशीर्वादाने पार पाडला. हा सोहळा गावच्या एक जुटीचा आणि भक्तीची अखंड परंपरा जपण्याचा ऐतिहासिक क्षण ठरला आहे. भक्ती भावाने सोहळ्याची सुरुवात या महायज्ञ व कलशपूजनाने झाली . शेकडो भाविकांच्या उपस्थितीत सर्व धार्मिक विधी श्रद्धेने पार पडल्या. माऊलीच्या चरणी अर्पण या



विधीने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. ह भ प महेश महाराज गिरी यांचे किर्तन झाले . व महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला ह भ प भागवत महाराज दोबाले यांनी उपस्थित सर्व साधुसंताचे आभार मानले. कीर्तन कार्यक्रमाने भक्तीचा झरा उचंबळून आला. भक्ती पूर्ण वातावरणात आणि माऊलीच्या नामस्मरणाने हदगाव नगरी दुम दुमदुमून गेली होती. संत महंताची मान्यवर उपस्थिती ने सोहळ्याची शोभा वाढविली. २०० हुन अधिक टाळकरी मंडळी उपस्थित होती. या सोहळ्याला माझी आरोग्य मंत्री राजेश भैय्या टोपे, सतीश होंडे, शेखर बापू सोळुंके, मनोज मरकड, प्रकाश बोराडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## दावरवाडी येथील महापरिनिर्वाण दीवस साजरा

दावरवाडी /प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील दावरवाडी येथील दावरवाडी ग्रुप ग्रामपंचायत च्या वतीने व ठीक ठीकाणी महापरिनिर्वाण दीन साजरा करण्यात आला प्रथम राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहुन त्यांना अभिवादन करण्यात आले महापरिनिर्वाण दिवसाचे दिवशी ठिकठिकाणी गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली



वाहून महापरिनिर्वाण दिवसाच्या अभिवादन करण्यात आले न्यू हायस्कूल उच्च माध्यमिक शाळा दावरवाडी तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले त्यावेळी सरपंच व ग्रामसेवक सदस्य गावातील नागरिक व मुख्यध्यापक शिक्षक शिक्षकेतर यांची वेळी उपस्थिती दर्शवली होती

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त लंडन किड्स शाळेत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

प्रतिनिधी : जाफराबाद हरी भालके

जाफराबाद

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लंडन किड्स, जाफ्राबाद येथे डिसेंबर शनिवार रोजी अभिवादन कार्यक्रम उत्साहात व भावपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी, पालकांनी तसेच स्थानिक मान्यवरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर त्यांच्या कार्यावर, विचारांवर आणि समाजातील योगदानावर प्रकाश टाकणारे मनोगत लघु घोरपडे यांनी विचार व्यक्त केले ..

या अभिवादन कार्यक्रमास आयकॉन बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व आयकॉन स्पोकन इंग्लिश क्लासचे संचालक उपस्थित होते. तसेच कॉग्रेसचे सुरेश गवळी, नगरसेवक अनिल बोर्डे ,वकील संघांचे तालुका अध्यक्ष ड विनोद डिगे मिलिंद सोनवणे, मिलिंद पारवे, गजानन तायडे, प्रकाश बोर्डे यांच्यासह विशाल हिवाळे,




शिक्षकवृंद व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दीपाली बनसोडे तर आभार संस्थेचे अध्यक्ष लहू घोरपडे यांनी मानून कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाम यशस्वतेसाठी लंडन किड्सच्या मुख्याध्यापिका नाजमिन पठाण व राणी भांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनामुळे व सहकार्यातून कार्यक्रम शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पूर्ण झाला.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्गदर्शन करताना अध्यक्ष लहू घोरपडे सर




पैठण /प्रतिनिधी

दावरवाडी येथील गुलाबराव खांडे सोशल फाउंडेशन च्या वतीने व ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त स्वर सागर भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता त्यावेळी उपस्थिती पाचोडगावचे सरपंच शिवराज भुमरे सोशल फाउंडेशन संस्थापक इंजिनियर चंद्रकांतराव खांडे त्यांचे बंधू प्रवीण खांडे सुरेश खांडे परमेश्वर खांडे सरपंच डी.डी. जाधव उप सरपंच प्रशांत देशमुख शामदादा तांगडे चेअरमन राजेंद्र वाघमोडे जि.प.स.कमलाकर एडके ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब एडके पत्रकार अंबादास एडके सो.मि.संतोष जबडे विष्णू सोरमारे धम्मदीप खांडे यावेळी नागरिकांच्या उपस्थित महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्याचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रथम त्यांच्या पुतळ्याला शिवराज भुमरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर सदाबहार भीम गीतांचा स्वर सागर तीन तास कार्यक्रम चालू होता हा कार्यक्रम बघण्यासाठी महिला व पुरुष यांनी उपस्थिती दर्शवली होती

# आन्वीत शिवसेने चा झंझावात उबाठा रा.कॉ.ला मोठा धक्का

जालना /प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते मा.श्री.एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्षाने जालना जिल्ह्यात आपले बळ आणखी वाढवले आहे.बदनापूर तालुक्यातील आन्वी जि.प. सर्कल गेवराई बाजार येथील उबाठा रा.कॉ.राष्ट्रवादी काँग्रेस) पक्षाच्या असंख्य निष्ठावान कार्यकर्त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख मा.श्री.भाऊसाहेब घुगे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीर प्रवेश करत राजकीय भूकंपाचे संकेत दिले आहेत.आन्वी येथील हा धडाकेबाज प्रवेश विरोधकांना मोठा धक्का मानला जात आहे.

नेतृत्वाचे मार्गदर्शन आणि कार्यकर्त्यांचा विश्वास

हा महत्त्वपूर्ण पक्षप्रवेश शिवसेनेचे उपनेते मा.श्री. अर्जुनराव खोतकर,खा.मा.श्री. श्रीकांत शिंदे,शिवसेना संपर्कप्रमुख मा.श्री भास्करराव अंबेकर,युवासेना सचिव मा.श्री. अभिमन्यू खोतकर,आणि मा.श्री.पंडितराव भुतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

जिल्हाप्रमुख मा.श्री.भाऊसाहेब घुगे यांनी प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत केले आणि त्यांना शिवबंधन बांधून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.शिंदे साहेबांच्या विकासपर्वावर विश्वास ठेवून आन्वी येथील कार्यकर्त्यांनी दाखवलेला हा विश्वास जिल्ह्याच्या राजकारणाची नवी दिशा स्पष्ट करणारा आहे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

प्रवेश केलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांची नावे

आन्वी येथील ज्या प्रमुख कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या भगव्या झेंड्याखाली आपली निष्ठा जाहीर केली रमेश सुखदेव,दिनेश राठोड, ढाकणे नानासाहेब, गणपत भोसले, भरत रामनाथ भोसले, देवानंद जनार्दन ढाकणे, सतीश अर्जुन ढाकणे, शत्रगुण विष्णू ढाकणे, बळीराम विष्णू ढाकणे,रोहित शरद ढाकणे, सोमीनाथ बाबासाहेब ढाकणे, गोविंद ताराचंद राठोड, पवन प्रेमदास राठोड, वैभव कृष्णा ढाकणे, सचिन हरी भोसले, रोहित बबन राठोड, देवेश अशोक ढाकणे तसेच,अर्जुन ढाकणे, ज्ञानेश्वर ढाकणे,रामेश्वर ढाकणे,शिवाजी ढाकणे,शसंतोष ढाकणे,विष्णू ढाकणे,योगेश ढाकणे,एकनाथ ढाकणे,शिवाजी ढाकणे,परमेश्वर ढाकणे,भरत भोसले,अर्जुन हरि भोसले,लड्डू मधुकर ढाकणे, यश ढाकण,साईनाथ ढाकणे, समाधान ढाकणे,शिवम ढाकणे, शरद ढाकणे,अभय राठोड, श्रीराम राठोड,प्रदीप ढाकणे, गोविंद ढाकणे,संतोष ढाकणे, ऋषिकेश ढाकणे,अमोल ढाकणे, रोहित शेठे,बाळू रोठे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.उपस्थित मान्यवर या धडाकेबाज पक्षप्रवेश सोहळ्यासाठी देवेश ढाकणे, अक्षय भोसले,संदीप ठाकणे, भरत ढाकणे यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

